# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २७ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.८२** **दिनांक : ११/१०/२०२४**

**विभाग :** बांधकाम विभाग:

**प्रस्तावाचा विषय :-** सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान जिल्हास्तर सन २२-२३ मधील अनुक्रमांक २३ सर्जेपूरा चौक ते तेलीखुंट रस्ता डांबरीकरण हे काम साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाउ साठे वस्ती सुधार योजना २२-२३ अंतर्गत सर्जेपूरा चौक ते अप्पु हत्ती चौक या लांबी मध्ये करणेबाबत.....

---*---

**ठराव :-** सुवर्ण जयंती नगरात्थान महाभियान जिल्हास्तर (राज्यस्तर) ही १५०.०० ोटी मधुन शहरातील २४ कामांचा प्रकल्प मंजूर झाला सदर कामाचा कार्यादेश होउन काम प्रगतीत आहेत. सदर काम मध्ये अनुक्रमांक १२ मध्ये पत्रकार चौक ते अप्पू हत्ती चौक लालटाकी ते न्यू कॉलेज हा रस्ता मंजूर असून अनुक्रमांक ११ मध्ये माळीवाडा वेस ते पंचपीर चावडी ते माणिकचौक ते भिंगारवाला चौक ते सर्जेपूरा चौक ते पेशवाई शॉप पर्यत असा अहमदनगर शहरातील मूळ गावठाण मधील रस्ता मंजूर आहे.

तथापि या दोन रस्त्यामधील असणारा गॅप म्हणजे पेशवाई श्रीमंत समोरील हत्ती ते अप्पू हत्ती लालटाकी चौक या रस्त्याच्या कार्यादेश यापूर्वी दलित वस्ती योजनेतून मंजूर असल्या कारणामुळे त्या ठिकाणचा रस्त्याचा भाग हा सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान राज्यस्तर मध्ये मंजूर केलेला नव्हता त्यामुळे दलित वस्ती मध्ये असणा-या तरतुदी वापरून सदर रस्ता करणे क्रमप्राप्त आहे.

परंतु प्रत्यक्षात उपलब्ध निधी नुसार रस्ता वाहतुकी योग्य करण्याच्या दृष्टीने त्रोटक तरतुदी वापरून रस्त्याचे अंदाजपत्रक केलेले आहे. परंतु दलित वस्तीच्या रस्त्याच्या लांबी व्यतिरिक्त रस्ता संकल्पना वर आधारित कॉक्रिटीकरण होणार असल्याने दलित वस्तीमध्ये असलेला निधीतील देखील तरतुदी थोडया जास्त करून रस्ता सुस्थितीत करण्यासाठी मजबुती करण्याच्या तरतुदी वाढवावे लागणार आहे. त्याकरिता या अगोदर मा.आयुक्त यांच्या दिनांक ३०/०५/२०२४ च्या मंजूरी अन्वये प्रभाग क्रमांक ९ सर्जेपूरा चौक ते तेलीखुंट चौक हा रस्ता डांबरीकरण इतर ठिकाणी करणे बाबतचा रस्ता प्रस्ताव मंजूर आहे. त्यानुसार दोन्ही कामाचे ठेकेदार एकच असून म्हणजे मे.एस एफ शेख कन्स्ट्रक्शन, अहमदनगर हे ठेकेदार आहेत.दोन्ही कामाच्या तांत्रिक मान्यतेसाठी वापरले दर सुध्दा देखील एकच आहे तसेच दोन्ही काम हे एकाच लांबी मधील वेगळया वेगळ्या ठिकाणचे आहेत

दोन्ही कामांचा एकत्रित अहवाल खालील प्रमाणे

अ) कामाचे नाव प्रभागा क्रमांक ९ व १० मधील हरिजन वस्ती गाोकुळवाडी, भारस्कर कॉलनी या रस्त्यांना जोसडणारा सर्जेपुरा चौक ते अप्पु हत्ती चौक रस्ता डांबरीकरण करणे.

लेखाशिर्ष :-साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाउ साठे नागरी वस्ती सुधार योजना २०२२-२०२३

प्रशासकीय मान्यता :- जा.क्र.६०८/२०२३ दि.३०/०३/२०२३

तांत्रिक मान्यता :- जा.क.तांत्रिक १०९९ दि.२३/०३/२०२३

इ निविदा क्रमांक :- ई निविदा क्र.९०९८५५

कार्यादेश - जा.क्र. बांधकाम निविदा ५१४ दि.२३/०२/२०२४ मुदत ४ महिने

अंदाजपत्रकीय रक्कम - रू. ६८,७०,०३१/-

सद्यस्थिती - सदर काम मंजूर नावाप्रमाणेच त्याच ठिकाणी करणे प्रमाणे व तरतुदीप्रमाणे काम प्रगतीत आहे

ब) कामाचे नाव प्रभाग क्रमांक ९ सर्जेपूरा चौक ते तेलीखुंट चौक रस्ता डांबरीकरण करणे

लेखाशीर्ष - महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान सन २०२२-२०२३

प्रशसकीय मान्यता - मा.जिल्हाधिकारी यांनी जा.क्र. ९६१ दिनांक २३/०२/२०२३

तात्रिक मान्यता - जा.क्र. तांत्रिक ९६१ दिनांक २३/०२/२०२३

इ निविदा क्रमांक - ई निविदा क्र ९०९०७३

कार्यादेश - जा.क्र.बांधकाम निविदा २३२ दिनांक ०५/१०/२०२३

अंदाजपत्रकीय रक्कम - रू.१२,००,०००/-

सद्यस्थिती - सदर मंजूर ठिकाणी सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान राज्यस्तर योजनेअंतर्गत कॉक्रिटीकरण प्रस्तावित असल्याने तत्कालीन आयुक्त यांच्या दिनांक ३०/०५/२०२४ रोजी च्या मान्यतेने सदर काम इतरत्र करणे बाबतची मान्यता त्यानुसार सदरचे काम त्याच लांबीमध्ये फक्त ठिकाण बदलून सर्जेपूरा चौक पेशवाई ते अप्पु हत्ती चौक लालटाकी या रस्त्यामध्ये तरतुदी वापर करणे योग्य होईल .नमूद प्रमाणे काम करणे योगय वाटते असे बांधकाम विभागाचे स्पष्ट मत आहे.

तरी सदर सादर केलेल्या प्रस्तावाबाबत चर्चा पहाता सदरचा प्रस्ताव नामंजूर करणेत येत आहे.यास प्रशासक सर्व साधारण सभेची मान्यता देण्यात येत आहे.

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका, |

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २७ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.८३** **दिनांक : ११/१०/२०२४**
**विभाग :** नगररचना विभाग:

**प्रस्तावाचा विषय :-** केडगाव स.न. २६ मधील खुली जागा (ओपन स्पेस ) मिळणेबाबत..

---*---

**ठराव :-** अध्यक्ष श्री. प्रकाश लक्ष्मण पारखे, अहमदनगर जिल्हा पांचाळ सुवर्णकार स्नेहवर्धक मंडळ, अ.नगर यांनी केडगाव स.नं २६ या जमिनीच्या मंजुर रेखांनकनातील खुली जागा सुशोभिकरण करून सामाजिक उपक्रम या वापरासाठी परवानगी मिळणेबाबत विनंती अर्ज केलेला होता.

केडगाव स.नं. २६ ही जमिन शहराच्या वाढीव हद्दीच्या मंजुर विकास योजनेमध्ये रहीवास विभागात असुन या जागेच्या रेखांकनास या कार्यालयाने पत्र क्र २३६४ दिनांक १२-१०-१९९३ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर रेखांकनातील खुली जागेचे क्षेत्र २५९०.३१ चौ.मी. इतके आहे. सदर खुल्या जागेवर अहिल्यानगर महानगरपालिकेच्या नावाची नोंद लावण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक २/१२/२०२० रोजीच्या अधिसुचनेद्वारे लागु केलेल्या एकत्रीकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली (UDCPR) नियम क्र.३.४.७ मधील तरतुदी स्पष्ट आहेत. उक्त नियमावलीतील तरतुदीनुसार रेखांकनातील खुल्या जागेत अनुज्ञेय असलेले वापरच बंधनकारक आहे.

तथापी मंजुर रेखांकनातील खुली जागा ही त्याच रेखांकनातील भुखंडधारकांसाठी असुन ते इतर कोणासही विक्री अथवा भाड्याने देता येणार नाही. तसेच ती त्याच रेखांकनातील भुखंडधारकांच्या सामायिक वापरासठीच ठेवणे आवश्यक आहे.

मंजुर रेखांकनातील खुली जागा, उद्याने विकसित करणे देखभाल व दुरुस्ती करणे, खेळण्या बसविणे, लॉन विकसित करणे, बाकडे बसविणे, स्ट्रीट लाईट, पाणी व्यवस्था करणे इत्यादी करीता सामाजिक व स्वयंसेवी संस्था यांनी विकसित करणेसाठी तयारी दर्शविल्यास अशा प्रकारे पाप्त होणा-या प्रस्तावावर मा. आयुक्त यांनी निर्णय घेवुन कार्यवाही करणेस मा. महासभेचे ठराव क्र ५६ दिनांक १८/०२/२०१५ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

सबब खालील अटींच्या अधिन राहुन केडगाव स.नं. २६ खुली जागा क्षेत्र २५९०३.३१ चौ.मी. सुशोभिकरण करून सामाजिक उपक्रम विकसित करणेसाठी अध्यक्ष श्री.प्रकाश लक्ष्मण पारखे, अहमदनगर जिल्हा पांचाळ सुवर्णकार स्नेहवर्धक मंडळ, अ.नगर या संस्थेस परवानगी देण्यास हरकत नाही.

अटी :- १) विषयांकित खुल्या जागेचा वापर रेखांकनातील भुखंडधारकांच्या सामायिक वापरासाठी करणे आवश्यक आहे. सदर जागेचा कोणत्याही वाणिज्य प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.

२) विषयांकित खुल्या जागेचा नियमाबाह्य अथवा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर दिलेली विकसन परवानगी रद्द करुन खुली जागा महानगरपालिका ताब्यात घेण्यात येईल.

३) सदर रेखांकनातील खुली जागा भुखंडधारकांनी हरकत घेतल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.

४) विषयांकित खुल्या जागा मंजुर रेखांकनातील भुखंडधारकास / नागरीकास विनामुल्य वापर करून देणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५) विषयांकित खुल्या जागेची मालकी महानगरपालिकेचीच राहील.

६) ओपन स्पेसमध्ये केवळ खुली जागा म्हणुन वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे.

वर नमुद अटींवर मंजुर रेखांकनातील खुली जागा सुशोभिकरण करुन सामाजिक उपक्रम विकसित करणेसाठी अध्यक्ष श्री. प्रकाश लक्ष्मण पारखे, अहमदनगर जिल्हा पांचाळ सुवर्णकार स्नेहवर्धक मंडळ. अहमदनगर यांना देणेस प्रशासक सर्व साधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २७ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.८४** **दिनांक : ११/१०/२०२४**

**विभाग :** बांधकाम विभाग:

**प्रस्तावाचा विषय :-** जिल्हा वार्षिक योजना - २०२४- २५ अंतर्गत अंगणवाडयांना मंजुरी मिळणेबाबत..

---*---

**ठराव :-** मा.आ.श्री.संग्राम अरूणकाका जगताप, नगर शहर, यांनी मा.जिल्हाधिकारी, (नियोजन) अहमदनगर यांचेकडेस शहर मतदार संघातील खाली नमूद ठिकाणी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत अंगणवाडयांना मंजूरी द्यावी असे पत्र दिलेले आहे. त्याअनुषंगाने खाली नमूद ठिकाणीच्या अंगणवाडयांची अंदाजपत्रके उक्त शासन निर्णयात नमूद प्रती अंगणवाडी केंद्र बांधकाम दरानुसार तयार करण्यात आलेली असून तांत्रिक मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

| अ.क्र. | कामाचे ठिकाण | तांत्रिक मान्यता रक्कम |
|---|---|---|
| १ | अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्र.क्र.१ भिस्तबाग परिसर | ११,२३,९०७/- |
| २ | अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्र.क्र.१ तपोवन रोड परिसर | ११,२४,५९६/- |
| ३ | अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्र.क्र.१ ढवणवस्ती | ११,२४,४५८/- |
| ४ | अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्र.क्र.१४मधील मनपा १६ नं.शाळा | ११,२४,४५८/- |
| ५ | अहिल्यानगर महानगरपालिकेच्या प्र.क्र.७ मधील बोल्हेगाव गावठाण | ११,२४,३२१/- |
| ६ | अहिल्यानगर महानगरपालिकेच्यादप्र.क्र.७ पोलिस कॉलनी,नंदनवन नगर | ११,२४,०४५/- |
| | **एकुण रक्कम रू.** | **६७,४५,७८५/-** |

तरी उक्त अंगणवाडी बांधकाम करणेबाबत रक्कम रू.६७,४५,७८५/- (अक्षरी रक्कम रू.सदुसष्ठ लाख पंचेचाळीस हजार सातशे पंच्यांऐंशी मात्र) खर्चाचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, (नियोजन) अहमदनगर यांचेकडेस सहा.संचालक, नगररचना, यांचा अभिप्राय घेवून प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणेस प्रशासक सर्व साधारण सभेची मंजूरी देण्यात येत आहे.

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २७ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.८५** **दिनांक : ११/१०/२०२४**

**विभाग :** बांधकाम विभाग:

**प्रस्तावाचा विषय :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सविधांच्या विकास लेखाशिर्ष ४२१७०५४१ अंतर्गत प्रस्तावित विकास कामास ना - हरकत मिळणेबाबत..

---*---

**ठराव :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोई सुविधांच्या विकास या लेखाशिर्ष अंतर्गत खालील कामे कार्यन्वयण यंत्रणा म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग अहमदनगर यांचेमार्फत करण्यात येणार आहेत. त्यासाठी उपअभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग ,अहमदनगर यांनी महानगरपालिकेचा ना-हरकत दाखला मिळणेबाबत विनंती केलेली होती, त्यानुसार इकडील जा.क्र.सा.बां.३२१२/१ दि.१३/०१/२०२३ अन्वये यापूर्वी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले. तथापि नगर विकास विभाग,शासन निर्णय क्रमांक - मनपा-२०२३/ प्र.क्र.३२७(३४)/१/ न.वि.-१६ दि.२५/०९/२०२४ नुसार खाली नमुद कामांना कार्यारंभ आदेश दिले नसल्यास सदर कामे रद्द करणेचे सुचित केले आहे. याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर यांनी सदर कामांना कार्यारंभ आदेश देण्यात आले नसल्याचे कळविले आहे.

| अ. क्र | प्रभाग क्रमांक | कामाचे नाव | यापूर्वी झालेल्या कामांचे वर्ष |
|---|---|---|---|
| ४४ | ९ | प्रभाग क्र.९ मधील वैष्णवी बुक स्टॉल ते माथेसुळ घरापर्यंत रस्ता डांबरीकरण/ कॉंक्रिटीकरण करणे. | २०१४ |
| ४५ | ९ | प्रभाग क्र.९ मधील बंग घर ते सातपुते घरापर्यंत रस्ता डांबरीकरण/ कॉंक्रिटीकरण करणे. | २०१४ |
| ४९ | ९ | प्रभाग क्र.९ मधील सपाटे घर ते जुने विठ्ठल मंदिर पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे / डांबरीकरण करणे. | २०१७ |
| ५७ | १३ | प्रभाग क्र.१३ मधील सातभाई गल्लीतील निसर्ग बंगला ते मधुमालती अपार्टमेंट पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे / डांबरीकरण करणे. | २०१७ |
| ५८ | १३ | प्रभाग क्र.१३ मधील शुभ अपार्टमेंट ते आकडे घर ते पायल चायनिज पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे / डांबरीकरण करणे. | २०१७ |

उक्त कामांऐवाजी संदर्भ क्र.५ अन्वये खाली नमुद विकास कामे प्रस्तावित केलेली आहेत.

| अ. क्र | प्रभाग क्रमांक | कामाचे नाव | यापूर्वी झालेल्या कामांचे वर्ष |
|---|---|---|---|
| १ | ९ | प्रभाग क्र.९ मधील मोहन बाग येथील आडेप घर ते माथेसुळ घरापर्यंत रस्ता डांबरीकरण/ कॉंक्रिटीकरण करणे. | १० वर्षापूर्वी |
| २ | ९ | प्रभाग क्र.९ मधील संभार पटांगण येथील क्यातम घर ते संभार घर ते नंदाल घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | १० वर्षापूर्वी |
| ३ | ९ | प्रभाग क्र.९ मधील सपाटे घर ते ढोरजे घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे. | १० वर्षापूर्वी |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | १३ | प्रभाग क्र.९ मधील नवरंग गल्ली येथील शेलार घर ते जोशी घर ते अडसूळ घर ते गुंडु घरापर्यंत रस्ता डांबरीकरण/ कॉक्रिटीकरण करणे. | १० वर्षांपूर्वी |
| ५ | १३ | प्रभाग क्र.९ मधील जंगुभाई तालीम येथील श्री ऑटो सेल्स ते सब्बन घरापर्यंत रस्ता डांबरीकरण/ कॉक्रिटीकरण करणे. | १० वर्षांपूर्वी |

तरी उक्त विकास कामांना प्रस्तावात नमूद अटी शर्तीनुसार कार्यवाही करणेस, नगररचना विभागाचा अभिप्राय घेवून नगर विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक - मनपा-२०२३/ प्र.क्र.३२७(३४)/१/ न.वि.-१६ दि.१७/०८/२०२३. चे शासन निर्णयातील अटी व शतीर्स अधिन राहुन सार्वजनिक बांधकाम विभाग, अहिल्यानगर यांना ना-हरकत प्रमाणपत्र देणेकामी प्रशासक सर्वसाधाण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २७ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.८६** **दिनांक : ११/१०/२०२४**

**विभाग :** बांधकाम विभागः

**प्रस्तावाचा विषय :-** शहर सौंदर्यकरण सन २०२३-२४ मधील चौक सुशोभिकर करणेच्या कामाबाबत.

---*---

ठराव :- शहर सौंदर्यकरण सन २०२३-२४ अंतर्गत अहिल्यानगर महानगरपालिकेस रु.सहा कोटी बक्षिस रक्कम प्राप्त असुन सदर निधीचा विनीयोग मा. अवर सचिव, पर्यावरण व वातावर्णीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक:अभियान २०२३/प्र.क्र.४६/तां.क्र १ दि. ०५/०६/२०२४ अन्वये शहर सौंदर्यकरण करणेबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे.

त्यानुसार मा. आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका यांची दि. २८/११/२०२३ अन्वये प्रशासकीय मान्यता प्राप्त असून इकडील कार्यारंभ आदेश सा.बा.वि. जावक क्र. ५०१/२०२३-२४ दि. १६/०२/२०२४ अन्वये अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील जाधव नगर चौक, वडगाव गुप्ता सुशोभिकरण करणेच्या कामाचे कार्यारंभ आदेश चेअरमन, विकास मजुर सह. संस्था मर्या. अहिल्यानगर देण्यात यांना आलेले होते.

परंतु मा.विरोधी पक्ष नेता श्री. संपत विजय बारस्कर यांचे दि. ०४/१०/२०२४ रोजी इकडेस पत्र देउन जाधवनगर चौक, वडगाव गुप्ता या ठिकाणी राहणा-या नागरीकांची सदर ठिकाणी चौक सुशोभिकरण करणेस हरकत असल्याने जाधवनगर चौक, वडगांव गुप्ता सुशोभिकरण करणे ऐवजी ओरा टॉवर चौक सुशोभिकरण करणेबाबत मागणी केलेली आहे.

उपरोक्त परिस्थिती पाहता जाधवनगर चौक, वडगांव गुप्ता सुशोभिकरण करणे ऐवजी त्याच रकमेचे सुशोभिकरण ओरा टॉवर चौक येथे करणे उचित वाटते.

तरी जाधवनगर चौक, वडगांव गुप्ता येथील सुशोभिकरण करणे ऐवजी त्याच रकमेचे सुशोभिकण ओरा टॉवर चौक येथे करणेस व तसे सुधारीत कार्यरंभ आदेश संबंधीत ठकेदारास देणेच्या प्रस्तावास प्रशासक सर्व साधारण सभेची मंजूरी देण्यात येत आहे.

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका.

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका.

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २७ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.८७** **दिनांक : ११/१०/२०२४**

**विभाग :** बांधकाम विभागः

**प्रस्तावाचा विषय :-** शहर सौंदर्यकरण सन २०२३-२४ मधील चौक सुशोभिकरण करणेच्या कामाबाबत.

---*---

**ठराव :-** शहर सौंदर्यकरण सन २०२३-२४ अंतर्गत अहिल्यानगर महानगरपालिस रु.सहा कोटी बक्षिस रक्कम प्राप्त असुन सदर निधीचा विनीयोग मा. अवर सचिव, पर्यावरण व वातावर्णीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्रमांक:अभियान २०२३/प्र.क्र.४६/तां.क. १ दि. ०५/०६/२०२४ अन्वये शहर सौंदर्यकरण करणेबाबत आदेशीत करण्यात आलेले आहे.

त्यानुसार मा.आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त असुन इकडील कार्यारंभ आदेश सा.बा.वि. जावक क्र. ६०९/२०२३-२४ दि. ६/०३/२०२४ अन्वये फेर जाहिर निवीदा क्र. २१/५७ अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील केडगांव देवी समोरील दत्त चौक सुशोभिकरण करणेच्या कामाचे कार्यरंभ आदेश मे.एच.जी. पठाण कंस्ट्रक्शन कंपनी, अहिल्यानगर यांना देण्यात आलेले होते.

परंतु मा. नगरसेवक, श्री शेख नजीर अहमद अ. रज्जाक यांनी दि. ०९/१०/२०२४ रोजी इकडेस पत्र देउन केडगांव देवी समोरील दत्त चौक या ठिकाणी सुशोभिकरण करण्यास अडचण असल्याने त्या ऐवजी त्याच रकमेचे सुशोभिकरणाचे काम रॉयल चौक, जी.पी.ओ. रोड, पोस्ट ऑफिस जवळ सुशोभिकरण करणेबाबत मागणी केलेली आहे.

उपरोक्त प्रमाणे केडगांव देवी येथे समक्ष पाहणी केलेनुसार सदर ठिकाणी पुर्ण रुंदीला रस्त्याचे काम प्रगतीत असुन सदर चौक सुशोभिकरण केल्याने नागरिकांना रहदारीस अडचण होणार आहे. तसेच मोठ्या गाड्या उदा. ट्रक्टर, ट्रक्स जाताना वाहतुक कोंडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे केडगांव देवी चौक सुशोभिकरण करण्या ऐवजी त्याच रकमेचे सुशोभिकरणाचे काम रॉयल चौक, जी.पी.ओ.रोड, पोस्ट ऑफिस जवळ करणे उचित वाटते.

तरी केडगांव देवी समोरील दत्त चौक सुशोभिकरण करण्या ऐवजी त्याच रकमेचे सुशोभिकरणाचे काम रॉयल चौक, जी.पी.ओ.रोड, पोस्ट ऑफिस जवळ करणेस व तसे सुधारीत कार्यारंभ आदेश संबंधीत ठेकेदारास देणेच्या प्रस्तावास प्रशासक सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यात येत आहे.

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| **(मेहेर लहारे)** | **(यशवंत डांगे)** |
| प्र.नगरसचिव | प्रशासक, |
| अहिल्यानगर महानगरपालिका, | अहिल्यानगर महानगरपालिका, |

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

## नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २७ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.८८** **दिनांक : ११/१०/२०२४**

**विभाग :** घनकचरा व्यवस्थापन विभागः

**प्रस्तावाचा विषय :-** शासन निर्णयाच्या अनुषंगाने घनकचरा संकलन व व्यवस्थापनाच्या मॉनिटरींग करिता उपयोगी ICT Based तंत्रज्ञानाची अंमलबजावणी तातडीने सुरु करणेबाबत..

---*---

**ठराव :-** मे.आय.टी.आय.लिमीटेड, मुंबई या संस्थेने पत्र देवून आय.टी.आय.लिमीटेड ,मुंबई यांचे दि.२७/०९/२०२४ रोजीचे पत्र अन्वये मा. शासनाने घनकचरा व्यवस्थापन संकलन व वाहनांचे मागोवा व संनियंत्रण (Tracking and monitoring) करणेकामी मे.आय.टी.लिमीटेड, मंबई या संस्थेशी करारनामा केलेला असून सदर कामी सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी बंधनकारक केलेले असून त्या अनुषंगाने शासन निर्णय नगर विकास विभाग क्र.स्वमअ-२०२१/प्र.क्र.१२(३)/नवि-३४ दि.०७ ऑक्टोबर २०२१ अन्वये तंत्रज्ञानाचा Acceptance करुन तंत्रज्ञानाची अंमलबजावणी त्वरीत करणेबाबत पत्रामध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

तथापि, अहिल्यानगर महानगरपालिकेने दैनंदिन निर्माण होणारा कचरा संकलन व वाहतूक करणेकामी निविदा प्रक्रिया राबवून नियुक्त केलेल्या संस्थेस ICT based जी.पी.एस प्रणाली वापरणे बंधनकारक केलेले असून सदर प्रणाली ही मनपाने सन २०१९ पासूनच अंमलबजावणी केलेली आहे. तसेच सन २०२३ मध्ये ICT Based असणा-या मे. आयोटीक सोल्सूशन्स प्रा.लि.नाशिक या संस्थेमार्फत सदरची प्रणाली स्वीकारलेली आहे. सदर प्रणाली ही संदर्भीय शासन निणर्यातील अ.क्र. ६ मधील नमूद केलेनुसार शासन निर्णयातील नमूद केलेल्या संस्थेच्या दरापेक्षा कमी दरामध्ये संस्था उपलब्ध होत असल्यास सदर सेवा इतर संस्थांमार्फत उपलब्ध करुन घ्यावी असे नमूद असलेने अहिल्यानगर महानगरपालिकेने इतर संस्थेकडून सेवा उपलब्ध करुन घेतलेली आहे. त्याप्रमाणे आय.टी.आय. लिमीटेड, मुंबई या संस्थेस घनकचरा व्यवस्थापन विभाग जा.क्र.२५१ दि.१३/०८/२०२४ रोजीचे पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.तथापि, सदर संस्थेचे प्रतिनिधी समक्ष कार्यालयामध्ये येवून वारंवार पत्र देणेबाबत तगादा करत आहेत.

मे.आय.टी.आय.लिमीटेड, मुंबई या संस्थेच्या पत्रानुसार सदर संस्थेमार्फत शासन निर्णयानुसार काम करुन घेणेस तसेच सदरचे काम टप्या टप्याने घेणेस प्रशासक सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यात येत आहे.

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका,

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २७ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.८९** **दिनांक : ११/१०/२०२४**

**विभाग :** आस्थापना विभाग:

**प्रस्तावाचा विषय :-** श्री.करण सुर्यभान डापसे, बिगारी / वॉचमन यांनी त्यांच्या स्वत:चे सादर केलेले वैद्यकीय खर्चाचे परतावा देयक अदा करणे बाबत निर्णयाकरिता प्रस्ताव..

---*---

**ठराव :-** श्री. करण सुर्यभान डापसे, बिगारी/ वॉचमन हे अहिल्यानगर महानगरपालिके मध्ये आस्थापना सुचिवर कायम कर्मचारी म्हणून कार्यरत असुन त्यांनी त्यांच्या स्वत:चे रू.३,००,०००/- पेक्षा जास्त असलेले वैद्यकिय खर्चाचे एकूण तीन प्रतीपुर्ती देयक इकडेस सादर कलेले असुन सदर वैद्यकिय खर्चाचे प्रतीपुर्ती साठी सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरिता अंदाजपत्रकामध्ये वैद्यकिय खर्च देयका पोटी रू.१,२५,००,०००/- (रूपये एक कोटी पंचवीस लाख मात्र) इतकी तरतूद मंजुर करण्यांत आलेली आहे.

तरी श्री.करण सुर्यभान डापसे,बिगारी / वॉचमन त्यांनी त्यांच्या स्वत:च्या सादर केलेले वैद्यकिय खर्चाचे एकूण तीन देयकांचे रक्कम रू.३,००,०००/-(रू.तीन लक्ष मात्र) पेक्षा पुढचे असून सदर देयकांची लेखापरिक्षण विभाग यांचेकडून तपासणी करून घेतलेली असून सदर देयकाची एकुण रू.४,८२,४८७/- (अक्षरी रूपये चार लाख ब्याऐंशी हजार चारशे सत्याऐंशी फक्त) इतकी होत असून सदर रक्कम अदा करणेस मा.महासभेची मंजूरी अवश्यक आहे.

तरी श्री.करण सुर्यभान डापसे,बिगारी / वॉचमन यांचे सादर केलेले वैद्यकिय खर्चाचे एकूण रू.४,८२,४८७/- परतावा देयक अदा करणेस मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णय:-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांक: एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका.

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका.

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहिल्यानगर ..

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २७ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं.९०** **दिनांक : ११/१०/२०२४**

**विभाग :** लेखा विभाग:

**प्रस्तावाचा विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका निधीतील विकास कामांची देयके क्रमवारीनुसार देणे बाबत..

---*---

**ठराव :-** उपरोक्त विषयास अनुसरून दिनांक १३/०९/२०२४ रसेजी सदरचा प्रस्ताव मा.प्रशासक स्थायी समिजी यांच्याकडेस सादर केला असता खालील प्रमाणे मा.प्रशासक ठराव क्र.२५६ दिनांक २४/०९/२०२४ अन्वये खालील प्रमाणे ठरावास मंजुरी देण्यात आलेली आहे. अहमदनगर महानगरपालिकेचे वेतन ,सेवानिवृती वेतन, पाणी पुरवठा विज बिल,स्ट्रीट लाईट बिल पेट्रोल, वाहन दुरूस्ती कर्मचारी इ.देयके देण्यासाठी दरमहा सुमारे १४ कोटी रूपयांची आवश्यकता लागते. माहे जुलै २०२४ या महिन्याचे जी.एस.टी अनुदान सुमारे २ कोटी ७४ लाख रूपये कमी प्राप्त झाले त्यामुळे जुलै पेड इन ऑगस्ट २४ चे वेतन कपातीची सुमारे १ कोटी ३८ लाख अदा करता आले नाही.

अत्यावश्यक असलेली देणी मधील स्ट्रीट व पाणी पुरवठा लाइट बीलाचे सुमारे ७ कोटी ,शिक्षण विभाग वेतन हिस्सयाचे ३ महिन्याचे सुमारे ९० लाख, मानधन कर्मचारी ८ लाख,कोर्ट केसेस सुमारे ४० लाख,सेवानिवृती वेतन धारक यांचे ६ वा वेतन आयोगाचा फरकाचा हप्ता रूपये ९ लाख यामहिन्यात देणे बाकी आहे.याव्यतिरीक्त पुरवठादार,जेम वरिल पुरवठादार यांचीही देणी विहीत मुदतीत अदा करणे आवश्यक असल्याने त्यांचाही वारंवार पाठपुरवठा सुरू असतो.

विविध विकास कामांची देयके सन २००९ पासून थकीत आहेत.सदर देयके मिळणे साठी ठेकेदार वारंवार मागणी करित आहेत. तसेच विविध शासकीय योजनांचा मनपा हिस्सा भरणे बाकी असल्याने प्राप्त शासकीय निधी एवढीच रक्कम अदा केली जाते. मनपा फंडात पुरेशी शिल्लक रहात नसल्याने देयके अदा करता येत नाहीत. त्यामुळे ठेकेदार देयके मिळणेसाठी विविध प्रकारे दबाव आणून प्रयत्न करतात अशा परिस्थितीत काम करणे शक्य होत नाही व लोकांच्या रोषाला वारंवार सामोरे जावे लागते. त्याच बरोबर लोकांशी संवाद साधणे व त्यांचे समाधान करणे शक्य होत नाही. याशिवाय दैनंदिन संचिकांवर अभिप्राय देणे अभ्यासपूर्ण पणे प्रत्येक वेळी मुख्यलेखाधिकारी म्हणून शक्य होत नाही.काही ठेकेदार मनपा विरोधात देयके मिळविण्यासाठी मा.न्यायालयात जातात व मा.न्यायालय सुध्दा मनपाला देयके अदा करणे बाबत आदेशित करते.

अश्या परिस्थित देयके देण्याबाबत निश्चित धारण आखणे व त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

त्यानुसार सन २००९ ते २०२४ अखेर बिलांची क्रमवारी लावून देयकांची यादी मनपाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.तसेच सदर यादीबाबत हरकत घेणे कामी ठेकेदार यांना मुदत देवून हरकती मागविण्यात आलेल्या आहेत.त्यासाठी वृत्तपत्रात प्रसिध्दीसुध्दा देण्यात आलेली आहे.

त्यानुसार महानगरपालिकेकडे सोबत जोडल्यानुसार हरकती प्राप्त झाल्या असून काही हरकती मुदतीनंतर सुध्दा प्राप्त झाल्या आहेत.सदरचे अवलोकन केले असता सदरच्या हरकती मोघम स्वरूपाच्या दिसुन येत आहेत.तसेच काही हरकतींमध्ये आमची परिस्थीती बिकट असल्याने आम्हाला लवकरात लवकर बील अदा करण्यात यावी असे म्हटलेले आहे.तसेच काही ठेकेदारांनी आमची बिले यादीमध्ये नसल्याबाबत मोघम स्वरूपाची हरकत घेतली आहे.त्यांनी त्याबाबतचे पुरावे सादर केल्यास त्यांची बिले सेवाजेष्ठतायादीमध्ये समाविष्ठ करणे उचित होईल.

तरी वरील हरकतींचा विचार करता कोणत्याही ठेकेदारावर अन्याय होवू नये या दृष्टीने जेष्ठता यादीनुसार देयके देणे बाबत कार्यवाही करावी यास मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका.

सही/-
**(यशवंत डांगे)**
प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका.